# राष्ट्रीय नोंदवही साठी आस्थापनांची भौतिक तपासणी

## अन्वेशकांसाठी / गणकांसाठी क्षेत्रिय सूचना:

1. जिल्ह्यातील आस्थापनांच्या अस्तित्वाची तपासणी करून सातही कायद्यांअंतर्गत नोंदणी केलेल्या आस्थापनेची भौतिक तपासणी आस्थापनेच्या क्षेत्रिय कार्यालयास प्रत्यक्ष भेट देउन करावे.
2. सात अधिनियमे / कायदे (कंपनी कायदा–1956, कारखाने कायदा –1948, दुकाने व वाणिज्य आस्थापना कायदा–1948, सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट, 1860, सहकारी संस्था अधिनियम 1960, खादी व ग्रामोद्योग मंडळ आणी उद्योग संचालनालय (जिल्हा उद्योग केंद्र)
3. ज्या संस्थांचे अस्तित्व आढळून आलेले नाहीत किंवा आढळलेले नाहीत ते यादीप्रमाणेच चिन्हांकित केले पाहिजेत आणि योग्यप्रकारे प्रमाणित करावे.
4. आस्थापनेत कोणत्याही प्रकारचे विभाग किंवा एकत्रिपना करावयाची असेल तर ती दिलेली यादी विचारात घेऊन करावे.
5. भेटी दरम्यान यादीतील आस्थापना बंद व त्या ठिकाणी नविन आस्थापना आढळून आल्यास, तसेच नवीन आस्थापनांची नोंदणी 31 मार्च 2015 रोजी किंवा त्यापूर्वी झाली असल्यासच अशा नविन आस्थापनाची तपासणी करून फार्म भरावा.
6. योग्य आस्थापनासह स्वतंत्र आस्थापनासाठी स्वतंत्र नोंदणी करणे आवश्यक आहे.
7. जर एखादी आस्थापना क्षेत्रिय भेटी दरम्यान आढळल्यास परंतु तिचे नाव दिलेल्या यादीत नसेल, तर नव्या संस्थाना केवळ जाहीर केलेल्या सात कायदया अंतर्गत जर नोंदणी 31 मार्च 2015 रोजी किंवा त्यापूर्वी झाली असेल तरच तपासणी फार्म भरावा. .
8. एकदा आस्थापनेचे नाव, पत्ता आणि नोंदणी क्रमांक पडताळून पाहिला असेल तर, बीआरच्या अनुसूचीत 'एनेक्शर एम' मध्ये नमूद केलेले तपशील पूर्णपणे भरून घेतले पाहिजे.
9. तपासणी फार्म भरल्यानंतरच, आस्थापनाची कार्यपद्धती परिशिष्ट एन मध्ये दिलेल्या कोड / यादी प्रमाणे करावी.
10. गणकाला काळजी घ्यावी लागेल की आस्थापनांची पुन्हा पुनरावृत्ती होणार नाही आणि सर्व माहिती पूर्णपणे आणि व्यवस्थित भरली असेल.
11. कामाच्या प्रगतीचा साप्ताहिक सारांश अहवाल दिलेल्या स्वरूपात संलग्नक–1 मध्ये सादर करणे.
12. कच्चा डेटा, अंतिम डेटा (इलेक्ट्रॉनिक स्वरुपात) आणि इतर आवश्यक पत्रके एचजीव्हीबीएस ऑफिस व डीईएसच्या कार्यालयात मान्यता घेउन सादर करावी.
13. गणक, क्षेत्रीय कार्यालयातील सात कायदे अधिकारी किंवा जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांच्या संबंधित क्षेत्रातील कार्यालयाला योग्य प्रकारे भेट देवू शकतात. जिल्हा पातळीवर अधिकार्यांशी संपर्क तपशील परिशिष्ट एल येथे देण्यात आले आहेत.
14. सूचीमध्ये प्रदान केल्या गेलेल्या सर्व आस्थापना तपासणीदरम्यान संरक्षित कराव्यात.
15. गणकाने 'वर्कशीट' नुसार वाटप केलेल्या क्षेत्रात कार्य करावे आणि परवानगीशिवाय इतर गणक क्षेत्रांत जाणे आवश्यक नाही.
16. जर असे आढळून आले की गणकाने भ्रष्ट / फसव्या / अनुचित / दडपशाही पद्धतीने काम केले आहे तर सेवा बंद करण्याचा हा एक पुरेसा आधार असेल.
17. ओळखपत्र आणि प्राधिकरण पत्र दाखवून आस्थापनेतील मालक / कर्मचा–यांना गणकानी आपला स्वत:चा परिचय करून द्यावा.
18. गणकास अनुसूची 'एनेक्शर एम' च्या पुढील किंवा मागील बाजूस स्टॅम्प किंवा स्टॅम्पसह स्वाक्षरीने घ्या आणि समोरून आस्थपनाचा बोर्ड आणि कर्मचारी सह फोटो घ्यावा.

**आदेशान्वये**

**HGVBS: DES – NBR Project Cell**
Chandrapur, Maharashtra